राज्य माहिती आयोग,महाराष्ट्र राज्य, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांच्यासमोर माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ च्या कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले व्दितीय अपील

राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर
वचत भवन लेखा व कोषागार कार्यालयाच्या पाठीमागे,
छत्रपती संभाजीनगर -४३१००१

द्वितीय अपील क्रमांक १०७६/२०२६

बोर्ड अ.क्र.०३

श्री. सुरेंद्र दिगंबर गजभारे, — अपिलार्थी
रा. घर नंबर ५-२२-४३, श्रीमान श्रीमती कापड दुकानाच्या बाजूला
टिळकपथ पैठणगेट, छत्रपती संभाजीनगर.
मो. नंबर ९४०३८५८९२७.

विरुध्द

१ जन माहिती अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.१
प्रबंधक,
जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद

२ प्रथम अपिलीय अधिकारी तथा — : उत्तरवादी क्र.२
जिल्हा न्यायाधिश-०१, जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद

(सुनावणी दिनांक १३.०५.२०२६)

अपिलार्थी यांनी दि.०२.०३.२०२६ रोजी राज्य माहिती आयोग, खंडपीठ छत्रपती संभाजीनगर यांचेकडे माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ चे कलम १९ (३) अन्वये द्वितीय अपील दाखल केले आहे. सदर व्दितीय अपिलाची सुनावणी घेण्यात येणार असल्याबद्दल अपिलार्थी आणि उत्तरवादी यांना आयोगाच्या नोटीसव्दारे कळविण्यात आले. तसेच आज रोजी सुनावणीसाठीच्या बोर्ड (वाद सुची) आयोगाच्या संकेतस्थळावरही प्रसिध्द करण्यात आलेला आहे. सदर सुनावणीच्या अनुषंगाने सर्व संबंधितांना त्यांचे लेखी म्हणणे सादर करण्याची संधी उपलब्ध करुन देण्यात आलेली आहे. त्यानुसार आज रोजी सुनावणीसाठी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक, जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद, श्री. नितीन रा. मराठे उपस्थित आहेत. प्रथम अपिलीय अधिकारी अनुपस्थित आहेत.

अपिलार्थी यांनी त्यांच्या दि.२६.०९.२०२५ रोजी जोडपत्र "अ" नुसार जन माहिती अधिकारी यांचेकडे कलम ६ (१) अन्वये खालीलप्रमाणे माहिती मागितलेली आहे.

माहिती अर्जातील विषय
मा. प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश, औरंगाबाद यांचे कोर्टासमोरील दि.०५.०८.२०२५ रोजीचे साधारण १२ ते १२.३० दरम्यानचे व मुख्य न्यायदंडाधिकारी यांचे न्यायालयासमोरील ५.३० दरम्यानचे दोन पोलीसांनी केलेल्या असभ्य गुंडशाहीचे, हुकुमशाहीचे सी.सी.टी.व्ही.फुटेज मिळण्याची विनंती केलेली आहे.

आज रोजी सुनावणीदरम्यान अपिलार्थी यांनी अवगत केले की, जन माहिती अधिकारी यांनी मला कोणतीच माहिती उपलब्ध करुन दिलेली नाही. सदर मागणी केलेल्या माहितीची आवश्यकता असल्यामुळे ती उपलब्ध करुन देण्याचे जन माहिती अधिकारी यांना आदेशित करण्यात यावे.

आज रोजी सुनावणीदरम्यान जन माहिती अधिकारी यांनी अवगत केले की, अपिलार्थी यांच्या माहिती अर्जाच्या अनुषंगाने मागणी केलेल्या सदर कालावधीचे सी.सी.टी.व्ही. फुटेज या कार्यालयाकडे उपलब्ध नाही, सबब सदर माहिती माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ कलम २ (ज) नुसार आपणास पुरविता येणे या कार्यालयास शक्य नाही, असे दि.१५.१०.२०२५ रोजीच्या पत्रान्वये कळविण्यात आले आहे. तसेच प्रथम अपिलीय अधिकारी यांनी अपिलार्थी यांच्या प्रथम अपिलावर दि.२६.११.२०२५ रोजी सुनावणी घेऊन, अपिलार्थी यांचे माहिती नियमानुसार

माहिती अधिकार अधिनियम-२००५ चे कलम २(च) नुसार जन माहिती अधिकारी यांनी नाकारली आहे. या निर्णयाव्दारे त्यांनी, जन माहिती अधिकारी यांनी दिलेल्या प्रतिसादाचे समर्थन करुन अपिलार्थी यांचे प्रथम अपील नामंजूर करण्यात आलेले आहे.

प्रस्तुत प्रकरणात युक्तिवाद व उपलब्ध अभिलेखावरुन दिसुन येते की, अपिलार्थी यांना माहिती प्राप्त झाल्याचे दिसून येत नाही. त्यामुळे अपिलार्थी यांच्या युक्तिवादात व त्यांनी द्वितीय अपिलात नमूद केलेल्या प्रयोजनात तथ्यांश दिसून येत आहे.

सबब, आयोगाचे आदेश खालीलप्रमाणे आहेत.

<u>आदेश</u>

१. वर्तमान जन माहिती अधिकारी तथा प्रबंधक,जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद यांनी, अपिलार्थी यांच्या वर नमूद जोडपत्र अ मध्ये नमूद असलेली, कार्यालयात उपलब्ध असलेली व अधिनियमातील तरतुदीनुसार देय होणारी माहिती (अपिलार्थी यांच्याशी संबंधीत असलेले सीसीटीव्ही फुटेज देण्यात यावे) आयोगाचे आदेश प्राप्त होताच तीस दिवसाच्या आत अपिलार्थी यांना, अधिनियमातील कलम ७ (६) नुसार विनामूल्य उपलब्ध करुन द्यावी.

२. जिल्हा न्यायाधिश-०१, जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद यांना उपरोक्त निर्णयाच्या अंमलबजावणीकरिता प्राधिकृत करण्यात येत आहे.

३. उपरोक्त निर्देशासह अपिलार्थी यांचे व्दितीय अपील निकाली काढण्यात येत आहे.

(प्रकाश इंदलकर)
राज्य माहिती आयुक्त,
खंडपीठ छत्रपती संभाजीनगर

जा.क्र. 6271 दिनांक : 15/6/2026